-

**<u>रेग्युलर दिवाणी दावा क्रमांक १२७/२०१५ मधील निशाणी ९ वरील आदेश.</u>**

१. वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे कोर्ट कमिशनर नियुक्तीकरिता दाखल केला आहे त्याचे कथन असे आहे की, वादी यांनी सदरचा दावा वाटपाकरिता व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. दावा १—अ च्या शेतजमिनी हया वादी व प्रतिवादी यांच्या वडीलार्जीत आहेत. वादी व प्रतिवादी यांचा दावा मिळकतीत प्रत्येकी १/२ हिस्सा आहे. दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी यांची समाईकात कब्जे वहिवाट आहे.

२. दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान सरसनिरसमानाने अदयाप वाटप झालेले नाही. दावा गट नं. १८० या मिळकतीत वादी व प्रतिवादी यांनी एकत्रात कष्टमशागत करून चालू साली सोयाबीन, मिरची, हळद व ऊस अशी पिके केली आहेत. प्रतिवादी हा सदर भुमापन गट नं. १८० मधील वादी व प्रतिवादींनी समाईकात कष्टमशागत करून केलेल्या सोयाबीन, हळद, पिकू कापून ती परस्पर विल्हेवाट लावण्याच्या तयारीत आहे. तसेच सदर गट नं. १८० मधील ऊस पिक हे गळीतास तयार झाले असून ते देखील परस्पररित्या त्याचे एकटयाचे नांवे गळीताकरिता पाठवून देणार असल्याचे समजले आहे.

३. वर नमूद केले प्रमाणे प्रतिवादी हा गावांतील अन्य लोकांच्या मदतीने बेकायदेशीररित्या कृत्ये करण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोर्ट कमिशनर म्हणून वकीलांची नेमणूक करून त्यांना दावा भुमापन नं. १८० मधील सोयाबीन व हळद पिक यांची काढणी करून त्यांची रितसर विक्री करून सदर रक्कम मे. कोर्टात जमा करणेबाबत व त्याचप्रमाणे सदर दावा मिळकतीमधील ऊसाचे पिक हे साखर कारखान्याला पाठवून त्यापोटी येणारे ऊसाचे बिलाची रक्कम मे. कोर्टात जमा

करणेबाबत तसा कार्ट कमिशनर यांना आदेश करावा यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. सदर अर्ज मंजूर झालेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर झालेस दावा मिळकतीती समाईकातील पिकास वादी यांना मुकावे लागणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४. प्रतिवादी यांनी त्यांचे लेखी म्हणणे नि. १० वर दाखल केले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, सदर अर्जातील मजकूर हा चुकीचा, लबाडीचा असलेने तो प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. तसेच वादींचा दावा मिळकतीत १/२ हिस्सा आहे हे कथन प्रतिवादी यांनी नाकारले आहे.

५. दावा मिळकती व मौजे हणमंतवाडी येथील गट नं. ५४ या मिळकती वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूंबातील होत्या. सदर मिळकतीचे वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान वाटप करणेत आले व त्याबाबत दि. ०२.१२.१९९६ रोजी वाटणीचे स्मरणपत्र करण्यात आले. तथापी वादी हा गट नं. ५४ चे ७/१२ पत्रकी त्यांचे नांवाची नोंद असलेचा गैर फायदा घेवन ती विक्री करणेचा व प्रतिवादीच्या वहिवाटीला हरकत करू लागला म्हणून प्रतिवादी यांने मे. कोर्टामध्ये हक्कज्ञापनाकरीता व कायम मनाई करीता रे.क.नं.११०/२०१५ चा दावा वादी विरूध्द दाखल केलेला आहे व त्यामध्ये वादी विरूध्द मनाई आदेश पारील झालेला आहे. अशी वस्तुस्थिती असताना वादी यांना दावा मिळकतीमध्ये स्वतंत्र कब्जा दाखविणेसाठी व पुरावा निर्माण करणेसाठी तसेच प्रतिवादीचे नुकसान करण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

६. प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी हा नोकरी निमीत्य कायमस्वरूपी बाहेरगावी असतो व त्याला नोकरीचे व अन्य उत्पन्नाचे साधन आहे. प्रतिवादी हा शेतकरी असून प्रतिवादीकडे शेती शिवाय अन्य कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. अशा परिस्थितीत वादींचा अर्ज मंजूर झालेस प्रतिवादी व त्यांचे कुटूंबावर उपासमारीची वेळ येणार आहे. त्यामुळे वादी यांचा सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

७. वादीतर्फे वि.वकील श्री.एस.के.नंदगांवे व प्रतिवादी तर्फे वि.वकील

श्री.एस.व्ही.पोवार यांचा युक्तीवाद ऐकला.

८. वादी यांनी जी अर्जात कथने केली आहेत त्याबाबत पुरावा देण्याची संधी देवून चौकशी करणे आवश्यक आहे. वादी म्हणतात त्याप्रमाणे पिके ही समाईकात आहेत का वैयक्तीक आहेत याचा वाद कमीशन नेमूण सोडवणे योग्य होणार नाही या अनुमानास मी येते. तसेच सदर अर्ज मंजूर केलेस पुरावा गोळा करण्याची संधी वादी यांना देण्यात आली असे होईल. की, जो पुरावा वादी यांनी स्वतंत्रपणे सादर करून आपली बाजू मांडणेची आहे. अतिंमरित्या मी या अनुमानास येते की, अशा स्वरूपाचा अर्ज चालणेस पात्र नाही आणि अर्ज नामंजूर करणे जरूरी आहे. अंतिमरित्या मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. सदरचा अर्ज नामंजूर करणेत आला.

सही/—
(यामिनी बोरावके)
दिवाणी न्यायाधिश व स्तर,
गडहिंग्लज

दि. २१.०२.२०१९.

I affirm that the contents of this P. D.F file judgment/Order are same, word to word, as per the original judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | A.V.Chougule |
| Name of the Court | Civil Court, Senior Division. Gadhinglaj |
| Date of Dictation | 19-09-2018 |
| Judgment signed by the P.O on | 19-09-2018 |
| Judgment uploaded on | 19-09-2018 |